जनमानसाचा निडर आवाज...

# पुणे प्राईम न्यूज

मुख्य संपादक : जनार्दन दांडगे

दैनिक | वर्ष १ | अंक २३९ | बुधवार, २५ मार्च २०२६ | मूल्य : २ रु. | पाने : ४ | RNI NO - MAHMAR/2022/84210



BLUEVORA
WITH ADDED MINERALS
Pure Clean & Natural
PACKAGED DRINKING WATER


## उरुळी कांचन पोलिसांकडून अपघातातील जखमीलाच गुन्ह्याची धमकी?

### पोलिसांच्या भूमिकेवर संशय, नातेवाईकांचा गंभीर आरोप

**उरुळी कांचन, ता. २४ :** एकीकडे विश्वराज हॉस्पिटलकडून पैशासाठी अपघातात जखमी झालेल्या तरुणाला कथित अमानुष वागणूक मिळाल्याचा आरोप होत असतानाच, दुसरीकडे उरुळी कांचन पोलिसांनीही कुटुंबीयांना अपेक्षित सहकार्य न करता जुलमी न्याय दिल्याची बाब समोर येत आहे. पोलिसांकडे तक्रार नोंदवण्यासाठी गेल्यानंतर ती स्वीकारण्याऐवजी, तुमच्या जखमी मुलावरच गुन्हा दाखल होईल, अशी धमकी देत आम्हालाच माघारी पाठवण्यात आले, असा खळबळजनक आरोप जखमी तरुणाचे वडील योगेश चिकणे यांनी केला आहे. या प्रकारामुळे उरुळी कांचन पोलिसांच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, अपघातग्रस्त कुटुंबाला न्याय मिळवण्यासाठीच संघर्ष करावा लागत असल्याचे चित्र समोर आले आहे.




पुणेसोलापूर राष्ट्रीय महामार्गावरील सोरतापवाडी (ता. हवेली) ११ मार्च रोजी अपघात झाला होता. या अपघातात अनुराग योगेश चिकणे (वय २३, रा. भोसरे, ता. माढा) हा तरुण गंभीर जखमी झाला होता. त्याचा डावा हात अक्षरशः चिरडला गेला होता. लोणी काळभोर येथील विश्वराज हॉस्पिटलमध्ये त्याच्यावर तातडीची शस्त्रक्रिया करून हात कापण्यात आला. मात्र, कुटुंबाची आर्थिक परिस्थिती हलाखीची असल्याचे सांगूनही रुग्णालय प्रशासनाने ५० हजार रुपये भरल्याशिवाय डिस्चार्ज नाही असा कठोर पवित्रा घेतला. एवढेच नव्हे, तर पैसे जमा होईपर्यंत तब्बल १२ तास उपचार थांबवण्यात आल्याचा आरोप नातेवाईकांनी केला आहे. पैशासाठी रुग्णाचे उपचार रोखणे हा वैद्यकीय नैतिकतेचा सरळसरळ भंग असल्याची टीका होत आहे.

दरम्यान, अपघाताची नोंद घेण्यासाठी लोणी काळभोर पोलिसांनी एमएलसी केली; मात्र घटनाउरुळीकांचनपोलीसठाण्याच्या हद्दीत असल्याने तक्रार तेथे द्यावी, असे सांगण्यात आले. न्यायाच्या अपेक्षेने अनुरागचे नातेवाईक उरुळी कांचन पोलीस ठाण्यात गेले, मात्र तेथे त्यांना सहानुभूतीऐवजी धाक आणि दडपशाहीचा सामना करावा लागला. तुमच्या मुलाचीच चूक आहे तुमच्यावरच गुन्हा दाखल करू का? अशी उलट धमकी पोलिसांकडून देण्यात आल्याचा गंभीर आरोप कुटुंबीयांनी केला आहे. या वागणुकीमुळे घाबरून त्यांनी तक्रार नोंदविण्याचा प्रयत्नच सोडून दिला. अपघात होऊन १२ दिवस उलटूनही गुन्हा नोंदवला गेला नसल्याने पोलिसांच्या भूमिकेवर संशयाची छाया पडली आहे.

एकीकडे पैशासाठी उपचार थांबवणारे हॉस्पिटल आणि दुसरीकडे जखमीच्यावर गुन्ह्याची तलवार लटकवणारे पोलीस, या दोन्ही यंत्रणांच्या कारभारामुळे सामान्य नागरिकांनी न्याय कोणाकडे मागायचा, हा ज्वलंत प्रश्न उभा राहिला आहे. अपघातात अनुरागचा हात दंडापासून कापावा लागल्याने त्याचे संपूर्ण आयुष्यच बदलून गेले आहे. अशा स्थितीतही त्याच्या कुटुंबाला न्यायासाठी धावाधाव करावी लागत असल्याने प्रशासनाची संवेदनशीलता कुठे हरवली आहे, असा सवाल उपस्थित होत आहे.

या प्रकरणात संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कारवाई होणार का? जिल्हा पोलीस अधीक्षक संदीप सिंह गिल या घटनेकडे गांभीर्याने पाहणार का? आणि विश्वराज हॉस्पिटलच्या कारभाराची चौकशी होणार का? याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे. सामान्य माणसाच्या जिवाशी खेळणाऱ्या आणि न्याय नाकारण्याचा प्रयत्न करणाऱ्या या दोन्ही यंत्रणांवर कठोर कारवाई झाली नाही, तर नागरिकांचा विश्वास पूर्णपणे ढासळण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

> उपचारादरम्यान आमच्या जखमी मुलाची झालेली हेळसांड आणि अपघातास कारणीभूत ठरलेल्या वाहन चालकांविरोधात तक्रार देण्यासाठी गेल्यावर उरुळी कांचन पोलिसांनी दिलेली तुच्छ वागणूक ही माणुसकीला काळिमा फासणारी आहे. आम्ही कबाडकष्ट करून मुलाला मोठं केले. या अपघातामुळे आमच्यावर आधीच मोठं संकट कोसळलं आहे. त्यातच पोलिसांनी उलट तुमच्यावरच गुन्हा दाखल करू अशी धमकी दिल्याने आम्ही घाबरून गावी परतलो. आता आम्हाला न्याय कोण देणार?
> - **योगेश चिकणे,** (अनुरागचे वडील)

> जखमीच्या नातेवाईकांनी पोलीस ठाण्यात कोणाला आणि कधी भेट घेतली, याची सध्या अ म्ही माहिती घेत आहोत. तक्रारदारांनी थेट पोलीस ठाण्यात येऊन माझी भेट घ्यावी. त्यांच्या प्रकरणात पोलीस प्रशासनाच्या वतीने आवश्यक ती सर्व मदत केली जाईल.
> - **सचिन वांगडे,** (वरिष्ठ पोलीस निरीक्षक, उरुळी कांचन पोलीस ठाणे)

## संक्षिप्त

### चिखलीत मोबाईल तपासला म्हणून १६ वर्षांच्या मुलीची आत्महत्या

**पिंपरी, ता. २४ :** पिंपरी परिसरात एक अतिशय दुर्दैवी घटना घडली असून त्यामुळे स्थानिकांमध्ये हळहळ व्यक्त केली जात आहे. चिखली येथील जाधववाडी भागात राहणाऱ्या १६ वर्षीय मुलीने रागाच्या भरात टोकाचे पाऊल उचलल्याची माहिती समोर आली आहे. या घटनेमुळे कुटुंबावर दु:खाचे सावट पसरले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, २२ मार्च रोजी मुलगी घरी असताना तिच्या वडिलांनी तिचा मोबाईल तपासण्यासाठी घेतला. मुलीला हे आवडले नाही आणि ती नाराज झाली. या कारणावरून तिने रागाच्या भरात विष प्राशन केल्याचे सांगितले जात आहे. ही बाब लक्षात येताच कुटुंबीयांनी तिला तातडीने जवळच्या रुग्णालयात दाखल केले. डॉक्टरांनी उपचार सुरू केले होते, मात्र मुलीची प्रकृती गंभीर होती. उपचार सुरू असतानाच २२ मार्च रोजी तिचा मृत्यू झाला. या अचानक घडलेल्या घटनेमुळे परिसरात शोक व्यक्त केला जात आहे. शेजारी आणि नातेवाईकांनी कुटुंबीयांना धीर दिला आहे.

### गाडीवर १० लाखांचे कर्ज म्हणत अडवले; चालकाच्या हुशारीने लुटारूंचा डाव फसला

**लोणावळा, ता. २४ :** मावळ तालुक्यातील जुना पुणे-मुंबई महामार्गावर प्रवास करणाऱ्या वाहनचालकांसाठी चिंता वाढवणारी घटना समोर आली आहे. लोणावळ्याजवळ काही अज्ञात व्यक्ती बनावट बँक कर्जाचा बहाणा करून कार चालकांना अडवून लुटण्याचा प्रयत्न करत असल्याची माहिती मिळाली आहे. एका चालकाच्या सतर्कतेमुळे हा प्रकार उघड झाला असून त्याचा व्हिडिओही समोर आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित चालकाने काही दिवसांपूर्वी कार २४ मधून जुनी कार खरेदीकेली होती. तो लोणावळ्याजवळून जात असताना दोन दुचाकींवरून आलेल्या पाच जणांनी त्याचा पाठलाग केला. पुढे एका निर्जन ठिकाणी त्यांनी चालकाला गाडी थांबवण्यास भाग पाडले. गाडी थांबताच त्यांनी कारवर सुमारे १० लाख रुपयांचे बँकेचे कर्ज बाकी असल्याचा दावा केला आणि गाडी जप्त करण्याची धमकी दिली. या परिस्थितीत चालकाने शांतता राखत गाडीचे दरवाजे उघडले नाहीत आणि काचही खाली केली नाही. त्याने तातडीने पोलिसांशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला. पोलिस येत असल्याची चाहूल लागताच आरोपी तेथून पळून गेले. नंतर तपास केला असता संबंधित गाडीवर कोणतेही कर्ज नसल्याचे स्पष्ट झाले.

## लोणी काळभोर व आळंदी म्हातोबाची येथील हातभट्टी अड्ड्यांवर पोलिसांचा छापा

### एक जण ताब्यात तर महिला पसार




**लोणी काळभोर, ता. २४ :** अवैध हातभट्टी दारू निर्मिती व विक्रीविरोधात पुणे शहर पोलिसांनी मोठी मोहीम राबवत लोणी काळभोर परिसरात एका दिवसात दोन वेगवेगळ्या ठिकाणी सोमवारी (ता. २३) धडक कारवाई केली. गुन्हे शाखेच्या खंडणी विरोधी पथक-२ तसेच लोणी काळभोर पोलीस ठाण्याच्या तपास पथकाने केलेल्या या संयुक्त कारवाईत मोठ्या प्रमाणात तयार दारू, कच्चे रसायन व साहित्य जप्त करून जागीच नष्ट करण्यात आले. एका आरोपीला रंगेहाथ पकडण्यात आले असून एका महिला आरोपीने पोलिसांना चकवा देत पळ काढला आहे.

महेश विष्णु तरंगे (वय ३२, रा. कुंजीरवाडी) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. तर चंद्राबाई अरुण राखपसरे (वय ५२) यांच्यावरही लोणी काळभोर पोलिस ठाण्यात महाराष्ट्र दारूबंदी कायद्याच्या कलम ६५ (फ) व ६५ (ई) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहेत.

गुन्हे शाखेच्या खंडणी विरोधी पथक- २ चे पोलीस हवालदार कानिफनाथ कारखेले व त्यांच्या पथकाला गोपनीय बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, बेटवस्ती, थेऊर फाटा येथील कॅनॉलजवळील पत्र्याच्या शेडमध्ये काही महिला गावठी हातभट्टी दारू तयार करत आहेत. वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या आदेशानंतर पोलीस उपनिरीक्षक गौरव देव यांच्या नेतृत्वाखाली पोलिसांनी छापा टाकला. तेव्हा आरोपी महिला चंद्राबाई अरुण राखपसरे (वय ५२) ही पळून गेल्याचे आढळले.

दरम्यान, पत्र्याच्या शेडमध्ये तपासणी केल्यावर २० लिटरचे ६ डबे भरून ठेवलेले सुमारे १२० लिटर कच्चे रसायन तसेच तीन स्टीलच्या भांड्यात सुमारे ४५ लिटर तयार हातभट्टी दारू आढळून आली. पंचांच्या उपस्थितीत नमुने जप्त करून उर्वरित दारू, रसायन व भट्टीचे साहित्य जागीच नष्ट करण्यात आले. या कारवाईत अंदाजे १५ हजारांहून अधिक किमतीचा मुद्देमाल नष्ट करण्यात आला.

लोणीकाळभोरपोलीसठाण्याच्या तपास पथकाला आळंदी म्हातोबाची परिसरात रेल्वे पुलाजवळ एका इसमाकडून हातभट्टी दारूची विक्री सुरू असल्याची माहिती मिळाली. तपास पथक प्रभारी पोलीस उपनिरीक्षक दिगंबर सोनटक्के यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने सापळा रचून छापा टाकला.

या छाप्यात महेश विष्णु तरंगे (वय ३२, रा. कुंजीरवाडी) याला प्रत्यक्ष दारू विक्री करताना पकडण्यात आले. त्याच्या ताब्यातील पांढऱ्या पिशवीतून अर्धा लिटर क्षमतेचे ४० प्लास्टिक फुगे, म्हणजे सुमारे २० लिटर हातभट्टी दारू जप्त करण्यात आली. पोलिसांनी नमुने घेऊन उर्वरित दारू पंचासमक्ष नष्ट केली.

## वृक्षारोपण करून शंकर पाटील यांना कस्तुरी ग्रुपची ‘निसर्गमय’ श्रद्धांजली

### दशक्रिया दिनानिमित्त आंबळे येथील वन्यपरिसरात वृक्षारोपण



**उरुळी कांचन, ता. २४ :** उरुळी कांचन येथील कस्तुरी प्रतिष्ठानचे सचिव शंकर पांडुरंग पाटील यांच्या निधनाला दहा दिवस पूर्ण झाले. मंगळवारी (ता. २४) दशक्रिया विधीनिमित्त कस्तुरी ग्रुपच्या वतीने एक स्तुत्य उपक्रम राबवून त्यांना आगळीवेगळी श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. पाटील यांचे निसर्गप्रेम लक्षात घेऊन त्यांच्या जिव्हाळ्याच्या असलेल्या आंबळे (ता. पुरंदर) येथील वन्यपरिसरात वृक्षारोपण करण्यात आले.

शंकर पांडुरंग पाटील हे निसर्गप्रेमी व्यक्तिमत्व म्हणून ओळखले जात होते. त्यांच्या निधनामुळे कस्तुरी प्रतिष्ठान आणि परिसरात मोठी पोकळी निर्माण झाली आहे. केवळ शोक व्यक्त न करता, त्यांच्या स्मृती चिरंतन जपण्यासाठी कस्तुरी ग्रुपने त्यांच्या दशक्रिया दिनी वृक्षारोपणाचा निर्णय घेतला. आंबळे येथील निसर्गरम्य आणि वन्यपरिसरात विविध वृक्षांची लागवड करून त्यांच्या निसर्गसेवेचा वारसा पुढे नेण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला.

आंबळे येथील हा वन्यपरिसर शंकर पाटील यांच्या अत्यंत आवडीचा आणि जिव्हाळ्याचा होता. याच ठिकाणी वृक्षारोपण करून त्यांना आदरांजली वाहिल्याने कस्तुरी ग्रुपच्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे. पाटील साहेबांचे झाडांवर आणि निसर्गावर प्रचंड प्रेम होते, त्यांच्या आठवणी या वृक्षांच्या रूपाने नेहमीच बहरत राहतील, अशी भावना यावेळी ग्रुपच्या सदस्यांनी व्यक्त केली.

दरम्यान, यावेळी कस्तुरी ग्रुपचे सदस्य, कस्तुरी प्रतिष्ठानचे पदाधिकारी आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. वृक्षारोपणानंतर करण्यात आलेल्या श्रद्धांजली सभेत शंकर पाटील यांच्या सामाजिक क्षेत्रातील कार्याचा गौरवपूर्ण उल्लेख करण्यात आला.

## चाईल्ड हेल्पलाईनमुळे बालविवाह रोखला; एकाला अटक



**पुणे, ता. २४ :** ठाणे चाईल्ड हेल्पलाईनने वेळीच हस्तक्षेप करून रोखलेला एक बालविवाह, दुर्दैवाने कौटुंबिक हट्टामुळे एका भीषण गुन्ह्यात रूपांतरित झाला आहे. चाईल्ड हेल्पलाईनला चकवा देऊन अल्पवयीन मुलीला गावी नेऊन तिच्यावर अत्याचार केल्याप्रकरणी बाणेर पोलिसांनी अतुल दादा झेंडे (वय २३, रा. लोणंद, जि. सोलापूर) या नराधमाला बेड्या ठोकल्या आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, पीडित १७ वर्षीय मुलीचा विवाह अतुल झेंडे याच्याशी लावून दिला जाणार होता. मात्र, ठाणे चाईल्ड हेल्पलाईनला या बेकायदेशीर विवाहाची माहिती मिळताच त्यांनी पोलिसांच्या मदतीने हा बालविवाह रोखला होता. प्रशासनाने मुलीची सुटका केली होती, मात्र आरोपीच्या कुटुंबीयांनी कायद्याला धाब्यावर बसवून वेगळीच चाल खेळली.

नोव्हेंबर २०२५ मध्ये आरोपी अतुल झेंडेचे वडील पीडित मुलीला आपल्या लोणंद येथील घरी घेऊन गेले. तिथे तिला सक्तीने मंगळसूत्र घालण्यास लावले आणि तुमचे लग्न झाले आहे, असे सर्वांना सांगण्यास भाग पाडले. मुलगी अल्पवयीन आहे हे माहीत असूनही, आरोपी अतुल झेंडे याने नोव्हेंबर २०२५ ते जानेवारी २०२६ या नरकयातनेतून सुटका करून घेत पीडित मुलीने अखेर पुण्याच्या बाणेर पोलीस ठाण्यात धाव घेतली आणि आपल्यावर झालेला अन्याय सांगितला. पोलिसांनी घटनेचे गांभीर्य ओळखून तातडीने गुन्हा दाखल केला आणि आरोपी अतुल झेंडे याला सोलापूर जिल्ह्यातून अटक केली आहे.

सध्या बाणेर पोलीस ठाण्याच्या पोलीस उपनिरीक्षक शैला पाथरे या प्रकरणाचा सखोल तपास करत आहेत. चाईल्ड हेल्पलाईनने एकदा लग्न रोखल्यानंतरही मुलीला पुन्हा त्याच जाळ्यात ढकलणाऱ्या नातेवाईकांवरही कारवाई होण्याची शक्यता आहे. या घटनेमुळे बालविवाह रोखणाऱ्या यंत्रणांच्या मर्यादा आणि पालकांची मानसिकता यावर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

## वाघोलीत अधिकाऱ्यांना हाताशी धरून बिल्डरकडून फ्लॅटधारकांची फसवणूक?

### चौकशी समिती स्थापन करण्याची आमदार कटके यांची मागणी

**उरुळी कांचन, ता. २४ :** वाघोली (ता. हवेली) शहरात पायाभूत सुविधांचा अभाव असतानाही मोठ्या प्रमाणावर बहुमजली इमारतींना परवानगी दिली जातेय. त्यामुळे हजारो फ्लॅटधारकांची फसवणूक केली जात असल्याचा खळबळजनक मुद्दा आमदार ज्ञानेश्वर उर्फ माऊली कटकेयांनी अर्थसंकल्पीय अधिवेशनात उपस्थित केला. नियमबाह्य पद्धतीने ना-हरकत प्रमाणपत्र देणारे अधिकारी आणि संबंधित बांधकाम व्यावसायिकांची चौकशी करण्यासाठी उच्चस्तरीय समिती स्थापन करण्याची आग्रही मागणी आमदार कटके यांनी यावेळी केली.

आमदार कटकेयांनी सभागृहाचे लक्ष वेधताना सांगितले की, वाघोली शहरासाठी प्रादेशिक योजना (RP) १९९७ नुसार ३० मीटरचे रस्ते प्रस्तावित आहेत. मात्र, गेल्या अनेक वर्षांत हे रस्ते विकसित करण्यात आलेले नाहीत. असे असतानाही, पूर्वी PMRDA आणि आता पुणे महानगरपालिकेकडून पायाभूत सुविधा नसतानाही मोठ्या गृहप्रकल्पांना परवानग्या दिल्या जात आहेत. यामुळे सुमारे १५ ते २० हजार नागरिकांनी आपले हक्काचे घर घेतले, मात्र आता त्यांना रस्ते आणि इतर सुविधांसाठी संघर्ष करावा लागत आहे. ही फ्लॅटधारकांची सरळ सरळ फसवणूक आहे.



वाघोलीतील भीषण वाहतूक कोंडीचा प्रश्न मांडताना आमदार कटके म्हणाले की, नगर रोड आणि सोलापूर रोडवर लवकरच उड्डाणपूल (फ्लायओव्हर) आणि मेट्रोची कामे सुरू होणार आहेत. ही कामे सुरू झाल्यावर वाहतुकीचा प्रश्न अधिक गंभीर होईल. त्यामुळे ही कामे सुरू होण्यापूर्वी नगर रोड आणि सोलापूर रोडला जोडणारे पर्यायी (आरपी) रस्ते तातडीने विकसित करावेत. या रस्त्यांच्या कामासाठी शासनाने विशेष निधी उपलब्ध करून द्यावा. अशी मागणी आमदार कटकेयांनी अधिवेशनात केली.

दरम्यान, आमदार माऊली कटकेयांनी केलेल्या मागणीमुळे वाघोलीतील बांधकाम क्षेत्रात खळबळ उडाली आहे.

#### आमदारांच्या प्रमुख मागण्या

- नियमबाह्य NOC देणारे अधिकारी आणि बिल्डरांची चौकशी करण्यासाठी तातडीने समिती नेमावी.
- प्रलंबित आरपी रस्त्यांच्या विकासासाठी अर्थसंकल्पात विशेष तरतूद करावी.
- मेट्रोचे काम सुरू होण्यापूर्वी पर्यायी मार्गांचे जाळे तयार करावे.

## संक्षिप्त

### पाबे घाटातील अपघातात दोन जण जखमी

**राजगड, ता. २४ :** राजगड तालुक्यातील पाबे घाट हा वळणावळणांचा आणि निसर्गरम्य असला तरी, मध्यरात्री एका भीषण अपघातामुळे परिसर हादरला. वेल्हेहून पुण्याकडे निघालेल्या एका कारचे नियंत्रण सुटल्याने ती थेट २०० फुट खोल दरीत कोसळली. कात्रज येथील रहिवासी शुभम सचिन अजेटराव आणि अमित सचिन अजेटराव हे मित्र रात्री उशिरा वेल्हेहून पाबे खिंडीमार्गे पुण्याकडे निघाले होते. मध्यरात्री दोनच्या सुमारास घाट चढताना एका धोकादायक वळणावर चालकाचे नियंत्रण सुटले आणि कार दरीकडे झेपावली. दरीत कार कोसळल्याचा आवाज ऐकून परिसरात खळबळ उडाली. अपघाताची माहिती मिळताच वेल्हे पोलीस ठाण्याचे कर्मचारी आकाश पाटील यांनी तत्काळ आपत्ती व्यवस्थापन विभागाला पाचारण केले. मध्यरात्रीची वेळ आणि खोल दरी असल्यामुळे बचावकार्य आव्हानात्मक होते. परंतु पोलीस आणि आपत्ती व्यवस्थापन पथकाने धैर्याने दरीत उतरून जखमी मित्रांना शोधले. दोघांनाही गंभीर दुखापत झाली होती, पण स्ट्रेचरच्या साहाय्याने सुरक्षितपणे बाहेर काढण्यात आले. सुदैवाने, या भीषण अपघातात कोणतीही जीवितहानी झाली नाही. शुभम आणि अमित यांना तातडीने जवळच्या रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहेत. पाबे घाटातील ही धोकादायक वळणे रात्रीच्या वेळी चालकांसाठी अत्यंत जीवघेणी ठरतात. त्यामुळे या मार्गावर प्रवास करताना अधिक काळजी घेणे आवश्यक आहे.

### वसंत मोरेंना कोणत्याही क्षणी अटक होण्याची शक्यता

**पुणे, ता. २४ :** पुणे शहरातील शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे (उबाठा) गटाचे आक्रमक नेते व माजी नगरसेवक वसंत मोरे यांच्या अडचणीत कमालीची वाढ झाली आहे. अनुसूचित जाती-जमाती (अत्याचार प्रतिबंध) कायद्यांतर्गत (अॅट्रॉसिटी क्ट) दाखल गुन्ह्यात पुणे जिल्हा न्यायालयाने त्यांचा अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळून लावला आहे. यामुळे शिवाजीनगर पोलीस ठाण्याकडून मोरे यांच्या अटकेची कारवाई कोणत्याही क्षणी होण्याची दाट शक्यता वर्तवली जात आहे. शिवसेना (उबाठा) पक्षाचे पुण्यातील प्रमुख नेते आणि आक्रमक वक्तृत्वासाठी प्रसिद्ध असलेले वसंत मोरे यांच्यावर दलित समाजाच्या भावना दुखावणाऱ्या वक्तव्याचा आरोप ठेवण्यात आला आहे. या प्रकरणामुळे पक्षातील त्यांची प्रतिमा धोक्यात आली असून, राजकीय विरोधकांकडून टीकेची झोड उठवली जात आहे. दरम्यान, मोरे यांनी अटकेपासून वाचण्यासाठी अटकपूर्व जामीन अर्ज दाखल केला होता, मात्र न्यायालयाने दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकून आणि प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन हा अर्ज फेटाळला. न्यायालयाच्या या निर्णयामुळे पोलिसांना मोरे यांना ताब्यात घेण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. प्रकरणाची सुरुवात २५ फेब्रुवारी २०२६ रोजी पुणे महानगरपालिकेत वसंत मोरे यांनी घेतलेल्या पत्रकार परिषदेपासून झाली. या परिषदेत त्यांनी वंचित बहुजन आघाडीचे उपाध्यक्ष अविनाश विश्वनाथ लहाडे यांचे वडील विश्वनाथ तुकाराम लहाडे (वय -७२, ठेकेदार) यांच्याबद्दल वादग्रस्त आणि अपमानास्पद वक्तव्य केल्याचा आरोप आहे.

# प्रशासक सरपंचांना तात्पुरती परवानगी; मोठ्या निर्णयांवर न्यायालयाची बंदी

## अलंकार कांचन यांच्यासह इतरांनी दिले होते राज्य सरकारच्या निर्णयाला आव्हान

**उरुळी कांचन, ता. २४ :** राज्यातील सुमारे १४ हजार ५०० ग्रामपंचायतींची मुदत संपल्यानंतर तेथे प्रशासक म्हणून कोणाची नियुक्ती करावी, या वादावर मुंबई उच्च न्यायालयाने महत्त्वपूर्ण अंतरिम आदेश दिला आहे. न्यायमूर्ती रविंद्र व्ही. घुगे आणि न्यायमूर्ती अभय जे. मंत्री यांच्या खंडपीठाने हा निर्णय दिला असून, यामध्ये सरपंचांना प्रशासक म्हणून काम पाहण्याची मुभा दिली असली तरी त्यांच्या अधिकारांवर मोठे निर्बंध घातले आहेत.

याबाबत उरुळी कांचन येथील जिल्हा नियोजन समितीचे सदस्य अलंकार बाळासाहेब कांचन आणि



इतरांनी राज्य सरकारच्या त्या निर्णयाला आव्हान दिले होते, ज्याम ध्ये मुदत संपलेल्या सरपंचांनाच प्रशासक म्हणून नियुक्त करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. नागपूर, औरंगाबाद आणि कोल्हापूर खंडपीठांतही अशाच याचिका दाखल झाल्या आहेत. त्यानुसार उच्च न्यायालयाने या प्रकरणातील विशेष परिस्थिती लक्षात घेऊन निर्देश दिले आहेत ज्या सरपंचांना प्रशासक म्हणून नियुक्तीचे आदेश मिळाले आहेत, त्यांना पदभार स्वीकारण्याची परवानगी देण्यात आली आहे. पदभार स्वीकारल्या मुळे संबंधित सरपंचांच्या बाजूने कोणताही अतिरिक्त कायदेशीर हक्क निर्माण होणार नाही. प्रशासक म्हणून काम करताना सरपंच कोणताही धोरणात्मक निर्णय घेऊ शकणार नाहीत. मोठ्या खर्चावर बंदी घालण्यात आली असून, केवळ कर्मचारी वेतन, पाणी, वीज आणि इतर अत्यावश्यक सेवांच्या देयकांसारखा दैनंदिन प्रशासकीय खर्चच करता येईल.

दरम्यान, याचिकाकर्त्यांच्या वतीने वरिष्ठ वकील अतुल दामले युक्तिवाद करणार असून, सर्व बाजूंचे युक्तिवाद ऐकल्यानंतर न्यायालय पुढील निर्णय घेणार आहे. राज्य सरकारला २७ मार्च २०२६ पर्यंत आपले प्रतिज्ञापत्र सादर करायचे असून, पुढील सुनावणी ७ एप्रिल २०२६ रोजी दुपारी ३ वाजता होणार आहे.

### प्रशासन 'प्रमुखहीन' राहू नये म्हणून निर्णय

महाधिवक्ता डॉ. मिलिंद साठे यांनी न्यायालयात बाजू मांडताना सांगितले की, जर सरपंचांना रोखले गेले तर ग्रामपंचायती प्रमुखहीन राहतील किंवा संपूर्ण पंचायतीला प्रशासन चालवावे लागेल, जे संविधानाच्या कलम २४३(ए) च्या विरोधात जाईल. या प्रकरणातील सर्व याचिका आता एकत्रित करून मुंबईतील मुख्य आसनावर ऐकल्या जाण्याची शक्यता आहे.

### महिला आयोग अध्यक्षपदासाठी भाजप आग्रही

**पुणे, ता. २४ :** नाशिकमधील महिला अत्याचार आणि बलात्कार प्रकरणातील आरोपी भोंदू अशोक खरातच्या अटकेंतर रुपाली चाकणकर यांचा महिला आयोगाच्या अध्यक्षपदाचा राजीनामा घेण्यात आला. चाकणकर यांचा पायउतार झाल्यानंतर आता राष्ट्रवादीकडून म हिला आयोगाचे अध्यक्षपदी काढून घेण्याचा प्रयत्न भाजपकडून सुरू असल्याची माहिती आहे.

भाजपनं महिला आयोगाच अध्यक्षपद आता आपल्याकडे ठेवण्यासाठी आग्रह धरला असून बदल्यात राष्ट्रवादी काँग्रेसला महामंडळ देण्यात येणार असल्याचं समजतय. महिला आयोग पदावरून राष्ट्रवादी आणि भाजपात रस्सीखेच सुरू असल्याचं पाहायला मिळतय. महिला आयोग पद महायुतीत राष्ट्रवादीच्या वाट्याला असल्यामुळे ते राष्ट्रवादी काँग्रेस पक्षालाच मिळावे अशी राष्ट्रवादीची भूमिका आहे.

# खंडाळा घाटातील 'मिसिंग लिंक' १ मे पासून सुरु होणार...

**पुणे, ता. २४ :** मुंबई आणि पुणे या राज्यातील दोन सर्वात महत्त्वाच्या शहरांदरम्यानचा प्रवास अधिक वेगवान आणि सुरक्षित करण्यासाठी उभारण्यात आलेला मिसिंग लिंक प्रकल्प आता पूर्णत्वाच्या उंबरठ्यावर आला आहे. १ मे, महाराष्ट्र दिनाच्या पार्श्वभूमीवर हा मार्ग वाहतुकीसाठी खुला होण्याची शक्यता व्यक्त होत असून, त्यामुळे प्रवाशांना मोठा दिलासा मिळणार आहे.

सुमारे ६,६९५ कोटी रुपये खर्चून उभारण्यात आलेला हा १३.३ किलोमीटर लांबीचा प्रकल्प खोपोली एक्झिट ते कुसगाव दरम्यान विकसित करण्यात आला आहे. सध्याच्या मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर खंडाळा घाटातील धोकादायक वळणं, तीव्र



उतार-चढाव आणि पावसाळ्यातील दरडी कोसळण्याच्या घटनांमुळे वाहतुकीला अडथळे निर्माण होत असतात. या पार्श्वभूमीवर सुरक्षित आणि सरळ पर्यायी मार्ग उभारण्याची गरज होती. मिसिंग लिंक प्रकल्प त्याच गरजेचा परिणाम आहे.

या नव्या मार्गामुळे एकूण अंतर सुमारे ६ किलोमीटरने कमी होणार असून प्रवासाचा वेळ २५ ते ३० मिनिटांनी घटणार आहे. वाढत्या वाहनसंख्येमुळे आणि नियमित होणाऱ्या वाहतूक कोंडीमुळे त्रस्त असलेल्या प्रवाशांसाठी हा बदल म हत्त्वाचा ठरणार आहे. विशेष म्हणजे वेळेची बचत झाल्यामुळे इंधन वापरही कमी होणार असून, दररोज सुमारे १ कोटी रुपयांचे इंधन वाचण्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे. त्यामुळे हा प्रकल्प आर्थिक आणि पर्यावरणीय दोन्ही दृष्टीने फायदेशीर ठरतो.

या प्रकल्पातील टायगर व्हॅली परिसरातील केबल-स्टेड पूल हे विशेष आकर्षण आहे. सुमारे ६५० मीटर लांबीचा आणि १८२ ते १८४ मीटर उंचीवर उभारलेला हा पूल अभियांत्रिकी कौशल्याचा उत्कृष्ट नमुना मानला जात आहे. याशिवाय बोगद्यांमध्ये अत्याधुनिक सुरक्षा यंत्रणा, कॅमेरे आणि अग्निशमन सुविधा बसवण्यात आल्या आहेत. एकूणच, मिसिंग लिंक प्रकल्पामुळे मुंबई-पुणे प्रवासाचा चेहरामोहरा बदलणार असून, राज्याच्या पायाभूत सुविधांच्या विकासात ही एक महत्त्वाची झेप मानली जात आहे.

# वारजेत कौटुंबिक वादातून पत्नीची दुचाकी पेटवली

**पुणे, ता. २४ :** पुण्यातील वारजे परिसरात कौटुंबिक वादातून धक्कादायक प्रकार समोर आला असून, संतापाच्या भरात एका पतीने पत्नीची दुचाकी पेटवून दिल्याची घटना घडली आहे. या घटनेमुळे सोसायटीतील नागरिकांमध्ये भीती आणि संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित दाम्पत्यामध्ये गेल्या दीड वर्षांपासून वाद सुरू होता. मतभेद वाढत गेल्याने पत्नी माहेरी राहू लागली होती. पतीकडून तिला पुन्हा सासरी येण्यासाठी वारंवार प्रयत्न केले जात होते, मात्र पत्नीने स्पष्ट नकार दिल्याने तणाव अधिकच वाढत गेला. हा वाद शेवटी टोकाला जाऊन पोहोचला.

या पार्श्वभूमीवर पतीने संतापाच्या भरात थेट पत्नीला लक्ष्य करत कारवाई केली. तो रात्री उशिरा पत्नी राहत असलेल्या सोसायटीत पोहोचला. पार्किंगमध्ये उभी असलेली तिची दुचाकी ओळखून त्याने त्यावर ज्वलनशील पदार्थ टाकला आणि आग लावली. काही क्षणातच आगीने भीषण रूप घेत संपूर्ण दुचाकी जळून खाक झाली.

अचानक लागलेल्या आगीमुळे सोसायटीतील रहिवाशांमध्ये एकच खळबळ उडाली. रात्रीच्या वेळी घडलेल्या या प्रकारामुळे अनेकजण घाबरून घराबाहेर पडले. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही, मात्र मोठे नुकसान झाले आहे.

या प्रकरणी पोलिसांनी संबंधित व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल केला असून तपास सुरू आहे. ही घटना केवळ एका कुटुंबातील वाद नाही, तर वाढत्या वैवाहिक तणावाचे गंभीर रूप कसे धोकादायक ठरू शकते, याचे उदाहरण मानली जात आहे.





# इंदापूरकरात १००% शास्ती माफीची अभय योजना लागू

आदित्य बोराटे

इंदापूर, ता. २४ : इंदापूर नगरपरिषद क्षेत्रातील नागरिकांसाठी राज्य शासनाने मोठा दिलासा देणारा निर्णय घेतला आहे. थकीत मालमत्ता कराची वसूली वाढवण्यासाठी १०० टक्के शास्ती माफी देणारी अभय योजना मंजूर करण्यात आली असून ती आता इंदापूर नगरपरिषदेत लागू करण्यात आली आहे.

या योजनेनुसार, १८ मे २०२५ पर्यंत थकीत असलेला मालमत्ता कर नागरिकांनी ३१ मार्च २०२६ पर्यंत भरल्यास करावरील संपूर्ण दंड माफ केला जाणार आहे. मात्र मूळ कराच्या रकमेत कोणतीही सूट दिली जाणार नाही, असे स्पष्ट करण्यात आले आहे. त्यामुळे नागरिकांना फक्त दंडातून दिलासा मिळणार असून मूळ कर भरणे बंधनकारक राहणार आहे.


नगरपरिषदेने या योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी आवश्यक प्रक्रिया सुरू केली आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी नागरिकांनी नगरपरिषदेकडे अर्ज करणे गरजेचे आहे. संबंधित अर्जाची पडताळणी करूनच शास्ती माफीचा लाभ दिला जाणार आहे.

दरम्यान, ही योजना एकदाच लागू करण्यात येत असल्याने नागरिकांनी दिलेल्या मुदतीत कर भरावा, असे आवाहन करण्यात आले आहे. मुदत संपल्यानंतर कोणतीही सवलत मिळणार नसल्याचेही प्रशासनाने स्पष्ट केले आहे. या निर्णयामुळे इंदापूरमधील अनेक थकबाकीदार नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे. तसेच नगरपरिषदेलाही थकीत कर वसुलीत वाढ होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# पुणे महापालिकेत निधीच्या मुद्द्यावरून गोंधळ

**पुणे, ता. २४ :** पुणे महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेत आज मोठा गोंधळ पाहायला मिळाला. शहरातील विकासकाम ांच्या निधीवरून सत्ताधारी आणि विरोधी पक्षांमध्ये जोरदार वाद झाला. या वादामुळे सभागृहात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले.

सभेच्या सुरुवातीला शहरातील रस्ते, पाणीपुरवठा आणि कचरा व्यवस्थापन या विषयांवर चर्चा सुरू होती. मात्र निधी वाटपाचा मुद्दा पुढे आल्यानंतर वातावरण तापले. काँग्रेसचे गटनेते अरविंद शिंदे यांनी सत्ताधारी भाजपवर काही प्रभागांना जास्त निधी दिला जात असून विरोधी पक्षांच्या भागांकडे दुर्लक्ष केले जात असल्याचा आरोप केली. यावर भाजपच्या नेत्यांनीही आक्रमक भूमिका घेत प्रत्युत्तर दिले. या वादाचे




रूपांतर काही वेळातच बाचाबाचीत झाले. दोन्ही बाजूंचे नगरसेवक आपल्या जागेवरून उठून एकमेकांवर ओरडू लागले. काही जणांनी आक्रम क हातवारे करत विरोधकांना प्रत्युत्तर दिले. त्यामुळे सभागृहात सुमारे २ मि निटे गोंधळाचे वातावरण निर्माण झाले. महापौरांनी वारंवार शांतता राखण्याचे आवाहन केले, मात्र सुरुवातीला त्याचा परिणाम दिसून आला नाही.

यानंतर काही वेळाने परिस्थिती नियंत्रणात आली आणि पुढील कामकाज सुरू करण्यात आले. मात्र या घटनेमुळे शहरातील नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त केली जात आहे. नागरिकांना मूलभूत सुविधांसाठी अजूनही अडचणींचा सामना करावा लागत असताना सभागृहात अशा प्रकारचा गोंधळ होणे योग्य नसल्याचे मत व्यक्त केले जात आहे. दरम्यान, निधी वाटपावरून निर्माण झालेला वाद पुढील काळात आणखी वाढण्याची शक्यता वर्तवली जात आहे. या प्रकारामुळे शहरातील विकासकामांवर परिणाम होऊ नये, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# एकविरा देवीच्या यात्रेनिमित्त मावळात वाहतुकीत मोठे बदल

**पुणे, ता. २४ :** मावळ तालुक्यातील लोणावळा ग्रामीण हद्दीतील वेहेरेगावी येथे २६ मार्च रोजी श्री एकविरा देवी चैत्री यात्रा उत्सव २०२६ पार पडणार आहे. या यात्रेदरम्यान मोठ्या प्रमाणात भाविक उपस्थित राहणार असल्याने कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी प्रशासनाने विशेष खबरदारी घेतली आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी वाहतूक व्यवस्थेत तात्पुरते बदल करण्याचे आदेश दिले आहेत.

यात्रेच्या दिवशी म्हणजे २६ मार्च रोजी रात्री १२ वाजेपर्यंत या भागातील काही मार्गांवरील वाहतूक बंद ठेवून पर्यायी मार्गाने वळवण्यात येणार आहे. मावळ तालुक्यातील कार्ला फाट्याकडून एकविरा पायथा मंदिराकडे जाणाऱ्या



वाहनांना प्रवेश बंद करण्यात आला आहे. या मार्गावरील वाहने अग्रसेन हॉटेल वाहनतळ, लाजवंती महाविद्यालय वाहनतळ आणि दुर्गा परमेश्वरी वाहनतळ येथे वळवली जाणार आहेत.

तसेच २५ मार्चच्या रात्री १२ वाजल्यापासून ते २६ मार्चला रात्री १२ वाजेपर्यंत जुना पुणे-मुंबई महाम ार्गावरील वडगाव फाटा ते कुसगाव बु. टोलनाका या दरम्यान जड वाहतुकीस बंदी घालण्यात आली आहे. या काळात जड वाहने मुंबई-पुणे महाम ार्गाचा पर्यायी मार्ग वापरतील.

याचप्रमाणे कुसगाव बु. टोलनाका ते वडगाव फाटा या मार्गावरही जड वाहतूक बंद राहणार आहे. भाविकांची हलकी वाहने वगळता इतर सर्व जड आणि अवजड वाहने पर्यायी मार्गाने वळवण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

यात्रेसाठी येणाऱ्या नागरिकांनी प्रशासनाने दिलेल्या सूचनांचे पालन करावे आणि वाहतूक नियमांचे पालन करून सहकार्य करावे, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

# भोंदू खरात प्रकरणात बडे नेते ही शामिल? १०० हून अधिक अश्लील व्हिडीओ

**नाशिक, ता. २४ :** भोंदूबाबा अशोक खरात प्रकरणाने आता थेट विधानसभेचे राजकारण तापवले आहे. सोमवारी झालेल्या कामकाजात या मुद्द्यावर जोरदार गदारोळ झाला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सभागृहात स्पष्ट शब्दांत सांगितले की, या प्रकरणात कोणालाही क्लीन चिट दिली जाणार नाही आणि दोषींना कोणत्याही परिस्थितीत सोडले जाणार नाही. त्यांनी आज, मंगळवारी सविस्तर निवेदन देण्याची घोषणा केली.

विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी स्थगन प्रस्तावाद्वारे सरकारला घेरत गंभीर आरोप केले. त्यांच्या मते, या प्रकरणाशी संबंधित १०० हून अधिक व्हिडीओ क्लिप्स समोर आल्या असून, त्यात राजकीय नेते, आयएएस, आयपीएस अधिकारी आणि महसूल विभागातील अधिकाऱ्यांचा सहभाग असू शकतो. त्यांनी सर्व संबंधितांच्या कॉल डिटेल





रेकॉर्ड्स (सीडीआर) तपासण्याची मागणी केली. यानंतर भास्कर जाधव आणि नाना पटोले यांनीही सरकारवर टीका करत हा महाराष्ट्राच्या प्रतिष्ठेचा प्रश्न असल्याचे सांगितले.

या वादात हस्तक्षेप करत मुख्यमंत्री फडणवीस यांनी तपासाची दिशा स्पष्ट केली. त्यांनी सांगितले की, सुरुवातीला भीतीपोटी तक्रार न करणाऱ्या महिलांनी आता पुढे येण्यास सुरुवात केली आहे. हे प्रकरण अचानक उघडकीस आलेले नसून, अटकेपूर्वीच १० मार्च रोजी लुकआउट सर्क्युलर (एलओसी) जारी करून आरोपीला पळून जाण्यापासून रोखण्यात आले होते.

या प्रकरणाचा गाभा अधिक गंभीर आहे. अध्यात्माच्या नावाखाली महिलांचे ब्रेनवॉशिंग, आर्थिक शोषण आणि लैंगिक अत्याचार यांचे जाळे उभे केल्याचा आरोप आहे. त्यामुळे हा केवळ गुन्हेगारी मुद्दा नसून सामाजिक आणि नैतिक संकट म्हणूनही पाहिला जात आहे.

### गजामध्ये अडकलेल्या मांजरीची अग्निशमन दलाकडून सुटका

**पिंपरी, ता. २४ :** नढेनगर येथील महादेव मंदिर परिसरात गजा मध्ये अडकलेल्या मांजरीची थेरगाव अग्निशमन दलाने धाडसी कारवाई करत सुखरूप सुटका केली. या बचावकार्यात दोन जवान किरकोळ जखमी झाले असून त्यांच्यावर उपचार करण्यात आले आहेत.ग्निशामक दलाकडून मिळालेल्या माहितीनुसार, नढे नगर, काळेवाडी येथील महादेव मंदिराजवळ एका मांजरीचा पाय बांधकामासाठी वापरण्यात येणाऱ्या लोखंडी गजा मध्ये अडकल्याची वर्दी अग्निशमन दलाला मिळाली. वर्दी मिळताच थेरगाव उप अग्निशमन केंद्राचे पथक तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. घटनास्थळी पाहणी केली असता, सुमारे साडेतीन फुट उंचीच्या गजामध्ये मांजरीचा पाय अडकून ती तडफडत असल्याचे दिसून आले. परिस्थितीचे गांभीर्य ओळखून जवानांनी बॅटरीवर चालणाऱ्या कटरच्या सहाय्याने गज काळजीपूर्वक कापला. मांजरीवर प्राथमिक उपचार केले.


# अन्नपदार्थात भेसळ करताना आढळला तर थेट मकोका लागणार

**मुंबई, ता. २४ :** राज्यात अन्न पदार्थांमध्ये होणारी भेसळ रोखण्यासाठी सरकार कठोर पावले उचलत आहे. अन्न आणि औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांनी विधानपरिषदेत स्पष्ट केले की, अन्न पदार्थांमध्ये भेसळ करणाऱ्यांविरुद्ध महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी प्रतिबंधक कायदा (मकोका) अंतर्गत कारवाई करण्यात येईल. हे पाऊल अन्नसुरक्षेला अधिक बळकट करण्यासाठी आणि संघटित भेसळ टोळ्यांवर दबाव आणण्यासाठी महत्त्वाचे मानले जात आहे.

शिवसेना आमदार डॉ. मनिषा कायंदे यांनी विधानपरिषदेत अन्न भेसळीच्या मुद्द्यावर प्रश्न उपस्थित केला होता. या चर्चेत सदस्य भाई जगताप, अॅड. अनिल परब, अमोल मिटकरी आणि कृपाल तुमाने यांनी उपप्रश्न विचारून सहभाग घेतला.

प्रश्नोत्तराच्या तासादरम्यान मंत्री झिरवाळ यांनी भेसळीच्या प्रकरणांना संघटित गुन्हेगारीचा भाग मानून मकोका लागू करण्याची घोषणा केली. भेसळ हे साधे गुन्हे नाहीत, तर ते संघटित गुन्हेगारीचे स्वरूप आहे. अशा रॅकेट्सवर कठोर कारवाई होईल, असे ते म्हणाले.

मंत्री झिरवाळ यांनी दुधातील भेसळ प्रकरणाचा विशेष उल्लेख केला. वसई आणि अंधेरी परिसरात अन्न व औषध प्रशासनाने टाकलेल्या छाप्यात दुधातील भेसळ सापडल्याने १४ जणांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. यापैकी चार जणांना तडीपार करण्याची प्रक्रिया सुरू



आहे. मुंबईसह मोठ्या शहरांत बाहेरून येणाऱ्या दूध पुरवठ्यावर विशेष लक्ष ठेवण्यात येत असल्याचेही त्यांनी सांगितले. मनुष्यबळ वाढवण्यासाठी प्रयत्न अन्न व औषध प्रशासन विभागातील मनुष्यबळ वाढवण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे. विभागाकडील पद भरतीसाठी वित्त विभागाकडे प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. अलीकडेच १९७ कर्मचाऱ्यांची भरती करून त्यांना प्रशिक्षणानंतर पदस्थापना देण्यात आली आहे. सुगंधित सुपारी (फ्लेवर्ड सुपारी) प्रश्नाच्या संदर्भात लवकरच बैठक घेतली जाईल, असेही मंत्री झिरवाळ यांनी स्पष्ट केले. हे पाऊल राज्यातील अन्नसुरक्षा अधिक मजबूत करण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरत आहे. भेसळीच्या प्रकरणांमुळे नागरिकांच्या आरोग्याशी खेळ होत असल्याने सरकारने कठोर धोरण अवलंबले आहे. मकोका सारख्या कायद्याच्या अंमलबजावणीमुळे भेसळ टोळ्यांवर मोठा दबाव येण्याची शक्यता आहे.

# संसदेत महिला खासदारांची संख्या झपाट्याने वाढणार



**पुणे, ता. २४ :** भारतीय लोकशाहीमध्ये २०२९ च्या लोकसभा निवडणुकांमध्ये ऐतिहासिक बदल पाहायला मिळणार आहे. केंद्र सरकार 'नारी शक्ती वंदन अधिनियम' (महिला आरक्षण विधेयक) अंमलबजावणीसाठी लोकसभेतील जागांची संख्या वाढवण्याच्या तयारीत आहे. सद्याची ५४३ जागा ८१६ वर पोहोचण्याची शक्यता आहे आणि या अतिरिक्त २७३ जागा केवळ महिलांसाठी आरक्षित केल्या जातील.

महिलांना ३३% आरक्षण देताना विद्यमान पुरुष खासदारांच्या जागांवर परिणाम होऊ नये, हा या निर्णया मागचा मुख्य उद्देश आहे. जागा ५०% ने वाढवल्यामुळे आधीच्या जागा कायम राहतील आणि नवीन वाढीव जागा महिलांसाठी आरक्षित केल्या जातील. यामुळे लोकसभेतील बहुमताचे प्रमाण २७२ वरून ४०९ वर पोहोचण्याची शक्यता आहे.

सरकारने २०११ च्या जनगणनेचा आधार घेऊन मतदारसंघ पुनर्रचना करण्याचा विचार केला आहे, कारण नवीन जनगणना वेळेत पूर्ण होणार नाही. या पुनर्रचनेनंतर महिला आरक्षण लागू करण्याचा मार्ग मोकळा होईल. जागा वाढल्यामुळे मोठ्या राज्यांचे प्रतिनिधीत्वही वाढेल. उदाहरणार्थ उत्तर प्रदेश ८० वरून १२०, बिहार ४० वरून ६०, केरळ २० वरून ३०, तमिळनाडू ३९ वरून ५९ आणि महाराष्ट्रातही २० ते २५ जागा वाढण्याची शक्यता आहे. तसेच अनुसूचित जाती (SC) आणि अनुसूचित जमाती (ST) साठी आरक्षित जागांमध्येही वाढ होईल.


SC जागा ८४ वरून १२६ आणि ST जागा ४७ वरून ७० पर्यंत वाढवण्याची शक्यता आहे. या निर्णयामुळे भारतीय लोकशाहीत महिला सक्षमीकरणासाठी मोठा टप्पा गाठला जाईल आणि राज्यांमध्ये जनप्रतिनिधींच्या संतुलित वितरणाचा मार्ग मोकळा होईल.

# पुणे पेट्रोल डीलर्स असोसिएशनकडून आयुष्मान भारत मोहिमेला चालना

## १३ हजार कर्मचाऱ्यांना आरोग्य सुरक्षा देण्याचे लक्ष्य

**पुणे, ता. २४ :** पेट्रोल पंप कर्मचाऱ्यांच्या आरोग्य सुरक्षेसाठी सामाजिक बांधिलकी जपत पुणे पेट्रोल डीलर्स असोसिएशनने आयुष्मान भारत प्रधानमंत्री जनआरोग्य योजना अंतर्गत मोठा उपक्रम हाती घेतला आहे. असोसिएशनच्या वार्षिक सर्वसाधारण सभेदरम्यान आयोजित विशेष कार्यक्रमात आयुष्मान भारत कार्ड वितरणाचा शुभारंभ करण्यात आला.

या उपक्रमाचे नेतृत्व केंद्रीय नागरी विमान वाहतूक व सहकार राज्यमंत्री तसेच पुणे लोकसभा मतदारसंघाचे खासदार मुरलीधर मोहोळ यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. कार्यक्रमास खासदार श्रीरंग आप्पा बारणे, पुण्याच्या महापौर मंजुश्री नागपुरे यांच्यासह राज्य व जिल्ह्यातील पेट्रोल डीलर्स संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते.




पुणे पेट्रोल डीलर्स असोसिएशनचे अध्यक्ष ध्रुव रूपारेल यांच्या पुढाकारातून हा उपक्रम राबविण्यात आला. त्यांना सीआयपीडीचे अध्यक्ष उदय लोढ तसेच समीर लाडकत, विजय लांडे, ज्ञानेश्वर वाल्हेकर, धनंजय शितोळे, क्षितिज कांकरिया, केयूर शाह, भाग्येंद्र चूडासमा, रोहन झांबरे आणि संदीप साखरे यांचे सहकार्य लाभले.

कार्यक्रमादरम्यान प्रतीकात्मक स्वरूपात ११ कर्मचाऱ्यांना आयुष्मान भारत कार्डांचे वितरण करण्यात आले. या उपक्रमाअंतर्गत पुणे जिल्ह्यातील सुमारे १३ हजार पेट्रोल पंप कर्मचाऱ्यांना आयुष्मान भारत कार्ड उपलब्ध करून देण्याचे महत्त्वाकांक्षी लक्ष्य असोसिएशनने निश्चित केले आहे. आयुष्मान भारत योजनेअंतर्गत पात्र कुटुंबांना दरवर्षी ५ लाख रुपयांपर्यंत आरोग्य विमा संरक्षण मिळते. या उपक्रमामुळे पुणे जिल्ह्यातील कर्मचाऱ्यांना मिळून सुमारे ६५० कोटी रुपयांपर्यंत आरोग्य संरक्षण कवच उपलब्ध होण्याची शक्यता आहे, ज्यामुळे हजारो कुटुंबांना मोठा आधार मिळणार आहे. या कार्यक्रमास जिल्ह्यातील ९०० पैकी सुमारे ६०० हून अधिक पेट्रोल पंप डीलर्स उपस्थित राहिले होते. यावरून असोसिएशनमधील ऐक्य आणि कर्मचारी कल्याणासाठीची बांधिलकी स्पष्ट झाली. कार्यक्रमाच्या शेवटी लोकप्रतिनिधी आणि पेट्रोल डीलर्स समुदाय यांच्यातील समन्वयातून सामाजिक जबाबदारीची नवी दिशा ठरवणारा हा उपक्रम असल्याचा संदेश देत कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

यावेळी बोलताना पुणे पेट्रोल डीलर्स असोसिएशनचे अध्यक्ष ध्रुव रूपारेल म्हणाले, हा उपक्रम केवळ कार्ड वाटपापुरता मर्यादित नसून पेट्रोल पंपांवर काम करणाऱ्या प्रत्येक कर्मचाऱ्याच्या आरोग्य व सन्मानाचे संरक्षण करण्याचा आमचा प्रयत्न आहे. आयुष्मान भारत योजनेमुळे हजारो कुटुंबांना दर्जेदार आरोग्यसेवा मिळण्याचा मार्ग मोकळा होत आहे.

# वाघोलीत 'महाराष्ट्र केसरी' स्पर्धा पाहायला गेलेल्या व्यक्तीचा अपघाती मृत्यू

**वाघोली, ता. २४ :** वाघोली येथील 'महाराष्ट्र केसरी' कुस्ती स्पर्धा पाहण्यासाठी गेलेल्या ७३ वर्षीय वृद्धाला भरधाव पल्सर मोटर सायकलने जोराची धडक दिली. या अपघातात इसमाचा उपचारादरम्यान दुर्दैवी मृत्यू झाला. हि घटना शनिवारी (ता. २१) गिरीराज ज्वेलर्सच्या समोर रात्री साडेनऊ वाजण्याच्या सुमारास घडली. याप्रकरणी दुचाकी चालकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. धक्कादायक बाब म्हणजे, धडक देणाऱ्या चालकाकडे वाहन चालविण्याचा परवानाही नसल्याचे समोर आले आहे.




वसंत मगरे (वय ७३, रा. व्हीलशार्यर सोसायटी केसनंद रोड वाघोली ता. हवेली जि.पुणे मुळ रा.मु.पो. यवतमाळ ता.वणी जि. यवतमाळ) असे अपघातात मृत्यू झालेल्या व्यक्तीचे नाव आहे. तर आकाश गंगाधर खेळगे (वय २४, धंदा बेरोजगार रा. खांदवेनगर त्रिमुर्ती जिम पाठिमागे मुळ रा. राजूरा बुद्रुक ता. मुखेड जि. नांदेड) असे गुन्हा दाखल करण्यात आलेल्या तरुणाचे नाव आहे. याप्रकरणी मयत वसंत मगरे यांचा मुलगा आंनद वसंतराव मगरे यांनी वाघोली पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे. त्यानुसार तरुणावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी आनंद मगरे हे 'मेडलाईन इंडस्ट्रीज'मध्ये नोकरीस आहेत. शनिवारी रोजी त्यांचे वडील वसंत मगरे हे महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धा पाहण्यासाठी सायंकाळी साडेसात वाजण्याच्या सुमारास घरून निघाले होते. रात्री साडेनऊ वाजण्याच्या सुमारास आनंद मगरे यांना एका अनोळखी नंबरवरून फोन आला. यावेळी त्यांनी सांगितले की, नगर-पुणे रोडवरील गिरीराज ज्वेलर्सजवळ वसंत मगरे यांचा अपघात झाला असून त्यांना एका खासगी रुग्णालयात दाखल केले आहे, आनंद यांनी तातडीने हॉस्पिटलमध्ये धाव घेतली, मात्र डॉक्टरांनी उपचारापूर्वीच त्यांचे निधन झाल्याची माहिती दिली. अपघाताची माहिती मिळताच पोलिसांनी केअर हॉस्पिटलमध्ये धाव घेतली. तिथे अपघातग्रस्त मोटर सायकल चालक आकाश खेळगे हा देखील उपचार घेत होता. दरम्यान, पोलिसांनी त्याची चौकशी केली असता, त्याच्याकडे पल्सर २२० चालविण्याचा कोणताही परवाना नसल्याचे निष्पन्न झाले. ही गाडी त्याची आई सुरेखा खेळगे यांच्या नावावर असल्याची माहिती त्याने दिली.

# इंदापूरमधील माळवाडी ग्रामपंचायतीत कचरा गाडी खरेदीवरून गैरव्यवहाराचा आरोप

आदित्य बोराटे

इंदापूर, ता. २४ : इंदापूर तालुक्यातील माळवाडी ग्राम पंचायतीत कचरा गाडी खरेदीच्या व्यवहारावरून वाद निर्माण झाला आहे. या खरेदीत मोठ्या प्रमाणात आर्थिक गैरव्यवहार झाल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. त्यामुळे ग्रामपंचायतीच्या कामकाजावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, महाराष्ट्र शासनाकडून कचरा गाडी खरेदीसाठी सुमारे ७.५ लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला होता. मात्र प्रत्यक्षात खरेदी करण्यात आलेल्या गाडीची किंमत सुमारे ३ लाख ९५ हजार रुपये असल्याचे सांगितले जात आहे. याशिवाय शोरूमकडून या गाडीचे कोटेशन सुमारे ३ लाख १२ हजार रुपये असल्याची माहितीही समोर आली आहे. या सर्व बाबींमुळे निधी आणि प्रत्यक्ष खर्च यामध्ये मोठा फरक दिसून येत आहे. त्यामुळे या व्यवहारात काहीतरी गडबड झाल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. ग्रामस्थांनी या प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची मागणी केली आहे.




तसेच खरेदी करण्यात आलेली गाडी नवीन आहे की जुनी, याबाबतही शंका उपस्थित करण्यात आली आहे. काही नागरिकांनी या गाडीच्या कागदपत्रांची तपासणी करण्याची मागणी केली आहे. या प्रकरणामुळे स्थानिक पातळीवर चर्चा सुरू झाली असून ग्राम पंचायतीच्या पारदर्शकतेवर प्रश्न उपस्थित होत आहेत.

प्रशासनाने या प्रकरणाची दखल घेऊन योग्य ती चौकशी करावी आणि दोषींवर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे. या प्रकरणात पुढे काय निर्णय होतो याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.




Printed & Published By Janardan Gowardhan Dandge on behalf of Pune Prime News Network and printed at SHREE SAMARTH PRINTERS, 686, SHIVGANGA CHAMBERS, SHOP NO. G1, BUDHWAR PETH PUNE, 411002, Maharashtra. and publishded at Shop no 201, Sunrise Complex, Pune-Solapur Road. loni kalbhor(station), Tal.: Haveli Dist.: Pune-412201 Maharashtra) Editor- Janardhan Dandge (Mo. No. 9922232222).

मुद्रक, प्रकाशक व संपादक : जनार्दन गोवर्धन दांडगे. हे दैनिक पुणे प्राईम न्यूज नेटवर्क करीता मुद्रक आणि प्रकाशक जनार्दन गोवर्धन दांडगे यांनी श्री स्वामी समर्थ प्रिंटर्स, ६८६, शिवगंगा चेंबर्स, शॉप नं. जी १, बुधवार पेठ, पुणे - ४११००२ महाराष्ट्र येथे मुद्रित केले व पुणे प्राईम न्यूज नेटवर्क, शॉप नं २०१, सनराईज कॉम्प्लेक्स, पुणे सोलापूर रोड, लोणी काळभोर (स्टेशन), ता. हवेली, जि. पुणे- ४१२२०१ येथे प्रकाशित केले. 'पुणे प्राईम न्यूज' मधील लेखांचे हक्क राखून ठेवले आहेत. पुणे प्राईम न्यूज हे 'पुणे प्राईम न्यूज नेटवर्क'चे व्यापारचिन्ह आहे. (पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी), दूरध्वनी : ९९२२२३२२२२, E Mail: puneprimenewsgmail.com.

प्राईम लाईफ



## केस गळती आणि थकव्याने त्रस्त आहात? मग या सुपरफुड्सचा आहारात करा समावेश

बदलती जीवनशैली आणि खाण्यापिण्याच्या चुकीच्या सवयींमुळे सध्या अनेकांमध्ये, विशेषतः महिला आणि तरुणांमध्ये लोहाची कमतरता मोठ्या प्रमाणावर दिसून येत आहे. शरीरात लोह कमी झाले की, रक्तातील हिमोग्लोबिन कमी होते, ज्याला आपण निमिया म्हणतो. यामुळे केवळ थकवाच येत नाही, तर त्याचा परिणाम तुमच्या केस, त्वचा आणि मानसिक आरोग्यावरही होतो.

लोहाची कमतरता आहे हे कसं ओळखावं?

विनाकारण सतत थकवा आणि अशक्तपणा जाणवणे.

पायऱ्या चढताना किंवा चालताना धाप लागणे.

हात आणि पाय थंड पडणे.

केस गळणे आणि नखे कमकुवत होणे.

उठताना डोळ्यांसमोर अंधारी येणे.

नैसर्गिकरित्या लोह वाढवणारे सुपरफुड्स

१. दररोज मूठभर शेंगदाणे आणि गुळाचा खडा खाल्ल्याने शरीरातील लोहाचे प्रमाण वेगाने वाढते. हा सर्वात स्वस्त आणि प्रभावी उपाय मानला जातो.

२. हिरव्या पालेभाज्यांचा राजा पालक पालक, मेथी आणि शेपू यांसारख्या भाज्यांमध्ये लोहाचा खजिना असतो. शक्य असल्यास या भाज्या लोखंडी कढईत बनवाव्यात, ज्यामुळे लोहाचे प्रमाण दुप्पट होते.

३. बीट रक्तातील लाल पेशी वाढवण्यास मदत करते, तर डाळिंबामुळे लोहाचे शोषण चांगले होते. दररोज एक ग्लास बीट-गाजर ज्यूस रक्ताची कमतरता दूर करू शकतो.

४. रात्री भिजवलेले ५-६ काळे मनुकेसकाळी रिकाम्या पोटी खाल्ल्याने लोहाची पातळी झपाट्याने वाढते. खजूर हा देखील लोहाचा नैसर्गिक स्रोत आहे.

नुसते लोहयुक्त पदार्थ खाऊन चालत नाही, तर ते शरीरात शोषले जाणे महत्त्वाचे असते. यासाठी अन्नासोबत व्हिटॅमिन उ (उदा. लिंबू, संत्री किंवा आवळा) घेणे आवश्यक आहे. जेवताना जेवणावर लिंबू पिळल्यास अन्नातील लोह शरीराला लवकर मिळते.

# भोंदूबाबा खरातप्रमाणे मंत्रालयातही जादूचं पाणी देणारे अधिकारी; मुनगंटीवारांचा सरकारला घरचा आहेर!

**मुंबई, ता. २४ :** विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात भाजपा नेते सुधीर मुनगंटीवार यांनी पुन्हा एकदा आपल्या आक्रमक शैलीत प्रशासकीय अधिकाऱ्यांचे वाभाडे काढले आहेत. अंधश्रद्धेप्रमाणेच अंधबुद्धीही धोक्याची आहे, असे म्हणत त्यांनी मंत्रालयातील काम चुकार अधिकाऱ्यांवर टीका केली.

मंत्रिमंडळात स्थान न मि ळालेले भाजपाचे ज्येष्ठ नेते सुधीर मुनगंटीवार हे विधिमंडळाच्या अधिवेशनात विरोधकांपेक्षाही काकणभर आक्रमक होऊन सरकार आणि अधिकाऱ्यांना धारेवर धरत असतात. त्यांचा आक्रमक पवित्रा अनेकदा दिसून आला आहे. कधी उपरोधिक तर कधी मिश्किल टिप्पणी करत ते सरकार आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांना सुनावत असतात. सध्या सुरू असलेल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनातही त्यांनी खरात प्रकरणाचा दाखला देऊन अधिकाऱ्यांवर टीका केली.

अर्थसंकल्पीय अधिवेशनात आश्वासन समितीचे अध्यक्ष रवि राणा यांनी आश्वासन समितीचा अहवाल पटलावर ठेवताना मंत्र्यांकडून देण्यात आलेल्या आश्वासनांवर अधिकाऱ्यांकडून वेळीच कारवाई केली जात नसल्याची तक्रार केली. आश्वासन समितीच्या बैठकांना अधिकारी उपस्थित राहत नाहीत, असेही ते म्हणाले. तसेच मंत्र्यांनीही दिलेल्या आश्वासनाची पूर्तता होते की नाही, याची माहिती घ्यावी, अशी मागणी त्यांनी केली.



आमदार सुधीर मुनगंटीवार यांचा विधानसभेत ऐतिहासिक विक्रम! हिवाळी अधिवेशनात तब्बल अशासकीय विधेयके विचारार्थ आमदार रवि राणा यांनी तक्रार व्यक्त मांडल्यानंतर सुधीर मुनगंटीवार यांनीही यावर भाष्य केले. आश्वासन समितीचा अहवाल मांडत असताना रवि राणा हतबल वाटत आहेत. अधिकारी जर बैठकांना येत नसतील तर मंत्रालयातही खरात सारखे जादूचे पाणी देणारे काही अधिकारी दिसत आहेत, अशी टीका मुनगंटीवार यांनी यावरून केली.

मंत्रालयात खरातसारखे जादूचे पाणी देणारे अधिकारी अंधश्रद्धेप्रमाणेच अंधबुद्धीही धोक्याची आहे. सभागृहात मंत्री मनापासून आश्वासन देतात. पण अधिकारी त्या फाईलवर निर्णय घेत नाहीत. जनतेने मंत्र्यांना सभागृहात पाठवले आहे, अधिकाऱ्यांना नाही, असेही मुनगंटीवार म्हणाले. तसेच अधिकाऱ्यांच्या नव्या पायंड्याची माहिती देताना मुनगंटीवार म्हणाले. अधिकारी मंत्र्यांची समजूत घालून हे आश्वासनच पूर्ण होणार नाही, असे सांगतात. त्यानंतर मंत्री आश्वासन समितीला हे आश्वासन पूर्ण होऊ शकत नाही, असे पत्र लिहितात.

सुधीर मुनगंटीवार यांनी या हा विषय मांडल्यानंतर विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी या विषयाची दखल घेतली. विधिमंडळाच्या विविध समित्या या सभागृहाचा आत्मा आहेत. समितीचे कामकाज होण्यासंदर्भात अधिकारी विलंब करत असतील किंवा समितीच्या बैठकींना हजर राहण्यास टाळाटाळ करत असतील तर ते अयोग्य आहे. सभागृहाच्या सार्वभौमत्वावर हा हल्ला आहे, हे मुळीच सहन केले जाणार नाही, यापुढे कोणत्याही अधिकाऱ्याची अनुपस्थिती कळविण्यात आली, तर त्या अधिकाऱ्यावर योग्य ती कारवाई केली जाईल, असे त्यांनी सांगितले.

# इराणमध्ये गॅस आणि पॉवर ग्रीडवर भीषण हल्ला; युद्धाच्या वणव्यात कुवेतमध्येही ब्लॅकआऊट

**पुणे, ता. २४ :** अमेरिका, इस्रायल आणि इराण यांच्यात सुरू असलेल्या संघर्षाला आता २४ दिवस पूर्ण झाले आहेत. एकीकडे आंतरराष्ट्रीय स्तरावर चर्चा करून तणाव कमी करण्याचे प्रयत्न सुरू असतानाच दुसरीकडे प्रत्यक्ष लष्करी कारवाया मात्र थांबण्याचे नाव घेत नाहीत. या संघर्षात आता एक मोठी घडामोडी समोर आली आहे. अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणच्या ऊर्जा आणि वीज प्रकल्पांवर होणारे हल्ले ५ दिवसांसाठी थांबवण्याचा निर्णय घेतल्याचे सांगितले आहे. त्यांनी तेहरानसोबत सकारात्मक चर्चा झाल्याचा दावा केला असला तरी इराणने मात्र असा कोणताही संवाद



झाला नसल्याचे स्पष्ट करत ट्रम्प यांचा दावा फेटाळून लावला आहे.

दरम्यान, इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतन्याहू यांनी इराणवरील कारवाई सुरूच राहील असे स्पष्ट केले आहे. या घडामोडींमुळे हॉर्मुझ सामुद्रधुनीकडे जगाचे लक्ष लागले आहे. या मार्गातून मोठ्या प्रमाणावर जागतिक तेल वाहतूक होते, त्यामुळे जहाजांच्या सुरक्षेबाबत अनेक देशांनी चिंता व्यक्त केली आहे. सोमवार आणि मंगळवारच्या मध्यरात्री इराणमधील खोर्रमशहर आणि इस्फाहान या औद्योगिक शहरांवर हल्ले झाले. या हल्ल्यां मुळे वीज आणि गॅस पुरवठ्यावर मोठा परिणाम झाला. एका गॅस पाइपलाइनला नुकसान झाल्याने खोर्रमशहरमधील वीज निर्मिती पूर्णपणे बंद पडली. स्फोट इतका मोठा होता की त्याची ज्वाला दूरवरून दिसत होती. या संघर्षाचा परिणाम शेजारील देशांवरही होत आहे. कुवेत मध्ये ड्रोन आणि क्षेपणास्त्रे रोखताना झालेल्या स्फोटामुळे वीज वाहिन्यांचे नुकसान झाल्याचे सांगण्यात आले. एकूणच परिस्थिती तणावपूर्ण असून पुढील काही दिवसांत काय घडेल याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. एकूणच संपूर्ण आखाती देशांमध्ये सध्या तणावाचे वातावरण असून पुढील काही दिवसांत हा संघर्ष कोणते वळण घेणार याकडे संपूर्ण जगाचे लक्ष लागले आहे.

## निगडीत पत्नीवर जीवघेणा वार

**पिंपरी, ता. २४ :** पिंपरी-चिंचवडमधील निगडी परिसरात एक धक्कादायक घटना समोर आली आहे. पत्नीच्या चारित्र्यावर संशय घेत पतीने तिच्यावर दगडाने हल्ला केल्याची माहिती मिळाली आहे. या हल्ल्यात महिला गंभीर जखमी झाली असून पोलिसांनी आरोपी पतीला अटक केली आहे. ही घटना २२ मार्च रोजी सायंकाळी सुमारे ५ वाजता घडली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पीडित महिला आणि आरोपी महादेव जाधव हे पती-पत्नी आहेत. महादेव जाधव हा मूळचा बुलढाणा जिल्ह्यातील असून सध्या रावेत परिसरात राहतो. संबंधित महिला निगडीतील एका कंपनीत काम करते. घटनेच्या दिवशी ती काम संपवून बाहेर पडत असताना आरोपी तेथे आला.

यानंतर दोघांमध्ये वाद झाला. पत्नीचे दुसऱ्या व्यक्तीसोबत संबंध असल्याचा संशय घेत आरोपीने




रागाच्या भरात रस्त्याच्या कडेला असलेला दगड उचलला. त्याने महिलेवर हल्ला करत तिला खाली पाडले आणि डोक्यावर वार केले. या हल्ल्यात महिला गंभीर जखमी झाली.घटनेनंतर महिलेने निगडी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. पोलिसांनी तात्काळ कारवाई करत आरोपीला अटक केली आहे. जखमी महिलेला उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली असून पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे. नागरिकांनी वादाच्या प्रसंगी शांतता राखण्याचे आवाहनही करण्यात आले आहे.

## कोरोनावेळी थाळ्या वाजवल्या, आता रिकामा सिलिंडर वाजवायचा का?

**मुंबई, ता. २४ :** इराण आणि इस्रायलमधील युद्धाच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेल्या वक्तव्याचा शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) नेते आणि खासदार संजय राऊत यांनी जोरदार समाचार घेतला आहे. पंतप्रधानांनी जगाला शांततेचे डोस पाजण्यापेक्षा आधी आपल्या देशातील मणिपूर आणि लडाखकडे लक्ष द्यावे, अशा शब्दांत राऊतांनी मोदींवर निशाणा साधला आहे. आगामी लोकसभा निवडणुकीच्या प्रचारादरम्यान आणि आंतरराष्ट्रीय घडामोडींच्या संदर्भात राऊतांचे हे विधान राजकीय वर्तुळात चर्चेचा विषय ठरत आहे.


संजय राऊत म्हणाले की, युद्धाच्या दिवसानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदींना साक्षात्कार झाला की संसदेत जाऊन सर्वांसमोर आपल्या विचारांची देवाणघेवाण करायला पाहिजे. सर्वांना सोबत घ्यायला हवे. आम्ही इतक्या दिवसांपासून बोलत होतो की, सर्वपक्षीय बैठक घ्या. तुम्ही सर्वांना बोलवा, जे संकट जगावर आलेले आहे ते भारतात येईल. याबाबत आपण सर्वांशी बोला, सर्वांचा सल्ला घ्या. पण, पंतप्रधानांना वाटले की, जेव्हा परिस्थिती आपल्या हातातून जात आहे, तेव्हा ते संसदेत आले. कोरोनावेळी थाळ्या वाजवल्या आता रिकामा सिलिंडर वाजवायचा का? असा सवाल राऊत यांनी उपस्थित केला आहे.

संजय राऊत यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले की, पंतप्रधान मोदी स्वतःला विश्वगुरू मानतात आणि रशिया-युक्रेन असो वा इराण-इस्रायल, प्रत्येक आंतरराष्ट्रीय वादात मध्यस्थी करण्याचा प्रयत्न करतात. मात्र, आपल्याच देशातील मणिपूर गेल्या अनेक महिन्यांपासून जळत आहे, तिथे शांतता प्रस्थापित करण्यात सरकारला अपयश आले आहे. तसेच लडाखमध्ये चीनची घुसखोरी आणि तिथल्या नागरिकांच्या मागण्यांकडे दुर्लक्ष होत असताना पंतप्रधान जगाला युद्ध थांबवण्याचा सल्ला देत आहेत, हे हास्यास्पद असल्याचे राऊत म्हणाले.

## दैवी शक्तीचा बनाव करणाऱ्या अशोक खरातचे 'काळी कृत्य' उघड

**नाशिक, ता. २४ :** नाशिक मध्ये स्वयंघोषित भोंदू बाबा म्हणून ओळखला जाणारा अशोक खरात याच्या कथित गुन्हेगारी साम्राज्याचे थर उलगडत चालले आहेत. सुरुवातीला काही महिलांच्या तक्रारींनी सुरू झालेलं हे प्रकरण आता मोठ्या घोटाळ्यात रूपांतरित झालं आहे. नव्याने ३ गुन्हे दाखल झाल्यानंतर त्याच्याविरोधातील एकूण प्रकरणांची संख्या ६ वर पोहोचली आहे, ज्यामुळे तपास यंत्रणांसमोर अनेक गंभीर प्रश्न उभे राहिले आहेत.

तपासात समोर येत असलेल्या माहितीनुसार, खरातने पूजा, तंत्र-मंत्र आणि भविष्यवाणीच्या नावाखाली अनेक महिलांचा विश्वास जिंकून त्यांचा लैंगिक छळ केल्याचा आरोप आहे. काही पीडित महिला पुढे आल्या असल्या, तरी सामाजिक



दबाव आणि भीतीमुळे अनेक जणी अजूनही गप्प असल्याचा संशय पोलिसांना आहे. याच पार्श्वभूमीवर पोलिसांनी विशेष हेल्पलाईन सुरू केली असून, पीडितांनी पुढे येण्याचे आवाहन केले आहे.

या प्रकरणाचा दुसरा महत्त्वाचा पैलू म्हणजे आर्थिक फसवणूक. पाथर्डी परिसरातील सुमारे २५ एकर जमिनीचे व्यवहार संशयाच्या भोवऱ्यात सापडले आहेत. शेतकऱ्यांचा दावा आहे की, कोट्यवधी रुपयांची फसवणूक करून त्यांच्या जमिनी बळकावण्यात आल्या. दैवी शक्ती आणि उपाय यांच्या नावाखाली विश्वास संपादन करून नंतर आर्थिक लाभ घेण्याचा हा पद्धतशीर प्रकार असल्याचा आरोप आहे. दरम्यान, एका विद्यार्थिनीवरही अत्याचार झाल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे. इतकंच नाही, तर एका व्यक्तीच्या मृत्यूबाबतही तक्रार नोंद झाली असून, या प्रकरणात खूनाचा गुन्हा दाखल होणार का, याची चर्चा सुरू आहे. आज खरातची पोलीस कोठडी संपत असून त्याला न्यायालयात हजर करण्यात येणार आहे. पुढील चौकशीसाठी पोलीस कोठडी वाढवण्याची मागणी होण्याची शक्यता आहे.

## मुंबई–पुणे एक्सप्रेसवेवर एकविरा देवीच्या यात्रेनिमित्त ३ दिवस टोलमाफी

**मुंबई, ता. २४ :** मुंबई-पुणे एक्सप्रेसवेवरून प्रवास करणाऱ्यांसाठी एक महत्त्वाची बातमी समोर आली आहे. लोणावळ्यातील कार्ला गडावर आई एकविरा देवीचा वार्षिक यात्रोत्सव आजपासून सुरू होत असून पुढील ३ दिवस मोठ्या उत्साहात साजरा केला जाणार आहे. या यात्रेसाठी मुंबई, ठाणे, नवी मुंबई आणि रायगड परिसरातून मोठ्या संख्येने भाविक येणार असल्यामुळे प्रशासनाने विशेष निर्णय घेतला आहे.

या पार्श्वभूमीवर एक्सप्रेसवेवर ३ दिवस टोलमाफी जाहीर करण्यात आली आहे. मंगळवार, बुधवार आणि गुरुवार असे ३ दिवस भाविकांना टोल न भरता प्रवास करता येणार आहे. या निर्णयामुळे यात्रेला जाणाऱ्या नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे. वाढत्या गर्दीमुळे टोल नाक्यांवर



होणारी अडचण आणि वेळेचा अपव्यय कमी करण्यासाठी ही सवलत देण्यात आली आहे. ही टोलमाफी सर्वांसाठी लागू नसून केवळ यात्रेसाठी जाणाऱ्या भाविकांसाठीच लागू आहे. त्यासाठी भाविकांनी खासदार सुरेश म्हात्रे यांनी दिलेले अधिकृत टोलमाफीचे पत्र सोबत ठेवणे आवश्यक आहे. टोल नाक्यावर हे पत्र दाखवल्यानंतरच सवलत दिली जाणार आहे.

या निर्णयामुळे एक्सप्रेसवेवरील वाहतूक काही प्रमाणात सुरळीत राहण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. तसेच भाविकांना प्रवास अधिक सोपा आणि सुलभ होणार आहे. प्रशासनाने नागरिकांना नियमांचे पालन करण्याचे आणि सुरक्षित प्रवास करण्याचे आवाहन केले आहे.

## पोलीस निरीक्षक अविनाश शिळीमकर यांची सायबर पोलीस ठाण्यात बदली

**पुणे, ता. २४ :** महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ मधील तरतुदी तसेच सुधारित नियमांनुसार जिल्हा पोलीस आस्थापना मंडळाच्या बैठकीत महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला आहे. दिनांक २३मार्च२०२६रोजीझालेल्या बैठकीत जिल्ह्यातील पोलीस अधिकाऱ्यांच्या बदल्या आणि पदस्थापना करण्यास मंजुरी देण्यात आली. हा निर्णय प्रशासकीय गरज आणि जनहित लक्षात घेऊन घेण्यात आल्याची माहिती देण्यात आली आहे.



या बदल्यांमध्ये पोलीस निरीक्षक आणि सहाय्यक पोलीस निरीक्षक दर्जाच्या अधिकाऱ्यांचा समावेश आहे. काही अधिकाऱ्यांना नवीन जबाबदाऱ्या देण्यात आल्या असून काहींची बदली इतर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. अविनाश शंकरराव शिळीमकर यांची स्थानिक गुन्हे शाखेतून सायबर पोलीस ठाण्यात नियुक्ती करण्यात आली आहे. प्रमोद अंबादास क्षिरसागर यांना नियंत्रण कक्षातून स्थानिक गुन्हे शाखेत जबाबदारी देण्यात आली आहे.

सूर्यकांत कोकणे यांची सायबर पोलीस ठाण्यातून अर्ज शाखेत बदली झाली आहे. शंकर पाटील यांना कामशेत पोलीस ठाण्यातून वडगाव मावळ येथे पाठवण्यात आले आहे. तसेच ज्ञानेश्वर बाजगिरे यांना उरुळीकांचन येथून ओतूर पोलीस ठाण्यात नियुक्ती देण्यात आली आहे. आकाश पवार यांना कामशेत पोलीस ठाण्यात जबाबदारी देण्यात आली आहे.

याशिवाय सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन विठ्ठल कांडगे यांना नियंत्रण कक्षातून पारगाव पोलीस ठाण्यात पदस्थापना देण्यात आली आहे. सर्व संबंधित अधिकाऱ्यांनी तात्काळ नवीन ठिकाणी हजर राहण्याचे आदेश देण्यात आले असून त्याचा अहवाल सादर करण्यास सांगितले आहे.

# धर्म परिवर्तन केल्यास अनुसूचित जातीचा दर्जा मिळणार नाही; सर्वोच्च न्यायालयाचा मोठा निर्णय

**मुंबई, ता. २४ :** हिंदुस्थानच्या सर्वोच्च न्यायालयाने अनुसूचित जातींच्या ओळखीबाबत महत्त्वपूर्ण कायदेशीर स्पष्टीकरण देत धार्मिक मर्यादा पुन्हा अधोरेखित केल्या आहेत. संविधानानुसार अनुसूचित जातींना मिळणाऱ्या हक्क आणि संरक्षणाबाबत कोण पात्र आहे, याबाबतची दीर्घकालीन कायदेशीर चौकट या निर्णयातून स्पष्ट करण्यात आली. उच्च न्यायालयाच्या आधीच्या निर्णयाविरोधातील याचिका फेटाळताना सर्वोच्च न्यायालयाने जात ओळख ही विशिष्ट धार्मिक ओळखीशी निगडित असल्याचा सिद्धांत दृढ केला आहे.

न्यायमूर्ती पी. के. मिश्रा आणि न्यायमूर्ती मनमोहन यांच्या



खंडपीठाने स्पष्ट केले की, फक्त हिंदू, शीख किंवा बौद्ध धर्मातील व्यक्तींनाच अनुसूचित जातीचा दर्जा मिळू शकतो. जर एखादी व्यक्ती ख्रिश्चन किंवा इतर धर्म स्वीकारते, तर तिचा अनुसूचित जातीचा दर्जा संपुष्टात येतो. या निर्णयामागे ऐतिहासिक आणि घटनात्मक समज आहे की अनुसूचित जातींची संकल्पना या तीन धर्मांपुरती मर्यादित आहे. त्यामुळे इस्लाम किंवा ख्रिश्चन धर्म स्वीकारणाऱ्या व्यक्तींना हा दर्जा गमवावा लागतो.

ही बाब आंध्र प्रदेश उच्च न्यायालयातील चिंताडा आनंद या व्यक्तीच्या प्रकरणातून सर्वोच्च न्यायालयात पोहोचली होती. आनंद यांनी अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यांतर्गत तक्रार दाखल करत अक्काला रामिरेड्डी आणि इतरांवर जातीय अपमान व भेदभावाचे आरोप केले होते. या तक्रारीच्या आधारे पोलिसांनी गुन्हा दाखल केला होता. मात्र, आरोपींनी ही कारवाई रद्द करण्यासाठी उच्च न्यायालयात धाव घेतली.

मे २०२५ मध्ये न्यायमूर्ती एन. हरिनाथ यांनी प्रकरणाची सुनावणी करताना आनंद यांनी ख्रिश्चन धर्म स्वीकारल्याचे आढळले. या बदलामुळे त्यांच्या कायदेशीर स्थितीत फरक पडत असल्याचे नमूद करत उच्च न्यायालयाने एफआयआर रद्द केला. न्यायालयाने स्पष्ट केले की, धर्मांतरानंतर संबंधित व्यक्तीला अनुसूचित जातीचा कायदेशीर दर्जा राहत नाही, त्यामुळे त्यांना अत्याचार प्रतिबंधक कायद्यांतर्गत संरक्षण मिळू शकत नाही.

सर्वोच्च न्यायालयाने उच्च न्यायालयाचा हा निर्णय कायम ठेवत इतर धर्मात धर्मांतर केल्यास अनुसूचित जातीचा दर्जा गमावला जातो हा मुद्दा पुन्हा अधोरेखित केला. संविधान (अनुसूचित जाती) आदेश, १९५० च्या चौकटीत राहून दिलेल्या या निर्णयामुळे अशा प्रकरणांमध्ये कायदेशीर निकष स्पष्ट झाले आहेत. या निकाला मुळे सामाजिक लाभ आणि कायदेशीर संरक्षणाबाबत धार्मिक मर्यादा काय आहेत, याची ठोस जाणीव पुन्हा एकदा अधोरेखित झाली आहे.